# नि.दि.मु.क्र. १८०/२०१४ मधील निशाणी ८१ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ सहवाचन आदेश ६ नियम १७ अन्वये मयत वादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत व त्यानुसार दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरचा दावा ताकीद व दावा कलम १क मधील अतिक्रमीत बांधकाम स्वतःचे खर्चाने पाडून कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी क्र. १ मयत झाले असून त्यांचे वारस दाव्याचे कामी दाखल करणे गरजेचे आहे. सदर दुरूस्तीमुळे मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्ज र.रू. ५०००/– चे खर्चावर मंजूर करण्यात यावा.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादीचा विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द करण्याबाबतचे अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. मयत वादी क्र. १ हे दि. ३१/०१/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. दावा पुढे चालविण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दाव्याचे सरनाम्यात वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. त्यामुळे, सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ८१) वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– चा खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. वादीने सदरचा खर्च पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी यांना देणेचे आहे.

२) मयत वादी क्र.१ यांचे वारसांना दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत समाविष्ठ करावे.

३) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2022.10.14 17:17:23 +0530

पाटण ( प्र.शं. गिरगांवकर )

दि.१४/१०/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.